आधुनिक शहरातील घडामोडी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

e Paper

वर्ष 4 थे

www.metrocityvrutant.in  सोमवार दिनांक 11/05/2026  METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 4 || अंक 124 || RNI - MAHMAR /2021/51259 || metrocity924@gmail.com

# ‘गरज असेल तरच इंधन वापरा' -पंतप्रधान मोदी

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिला देशवासियांना महत्त्वाचा संदेश

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**हैदराबाद : पश्चिम आशियामध्ये सुरू असलेल्या युद्धजन्य परिस्थितीमुळे निर्माण झालेल्या जागतिक तेल संकटानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना महत्त्वाचा संदेश दिला आहे. “आजच्या काळाची गरज ओळखून पेट्रोल, डिझेल आणि गॅसचा वापर अत्यंत संयमाने करा,” असे आवाहन त्यांनी रविवारी केले. हैदराबाद येथे पार पडलेल्या एका कार्यक्रमात पंतप्रधान मोदींनी तेलंगणामध्ये सुमारे 9,400 कोटी रुपयांच्या विकासकामांचे उद्घाटन केले. यावेळी संबोधित करताना त्यांनी देशातील ऊर्जा सुरक्षेवर भाष्य केले.**



सध्या अमेरिका आणि इराण यांच्यात सुरू असलेल्या युद्धामुळे जागतिक बाजारपेठेत तेलाचा पुरवठा विस्कळीत झाला आहे. जगातील सर्वात महत्त्वाचा तेल वाहतूक मार्ग असलेल्या ‘होर्मुझची सामुद्रधुनी’ (Strait of Hormuz) बंद झाल्याने भारतासारख्या आयातीवर अवलंबून असलेल्या देशांसमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे.पंतप्रधान म्हणाले की, “आपल्याला आयात केलेल्या पेट्रोलियम उत्पादनांचा वापर केवळ आवश्यक असेल तेव्हाच करायचा आहे. यामुळे केवळ परकीय चलन वाचणार नाही, तर युद्धाचा आपल्या अर्थव्यवस्थेवर होणारा विपरीत परिणामही कमी होईल.”

पंतप्रधानांनी यावेळी भारताच्या वाढत्या ऊर्जा सामर्थ्याचीही उल्लेख केला. भारत आज सौर ऊर्जा निर्मितीत जगात आघाडीवर असल्याचे त्यांनी सांगितले. आयातीवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी सरकारने पुढील पावले उचलली आहेत.

पेट्रोलमध्ये इथेनॉल मिसळण्याच्या प्रमाणात मोठी वाढ करण्यात आली आहे.उज्ज्वला योजनेद्वारे गॅस कनेक्शन दिल्यानंतर आता स्वस्त पाइप गॅस पुरवठ्यावर भर दिला जात आहे. प्रदूषण कमी करण्यासाठी आणि स्वस्त इंधनासाठी सीएनजी जाळ्याचा विस्तार केला जात आहे.

# राज्यात लवकरच “लँड टायटलिंग अ‍ॅक्ट”

## नागरिकांना मिळणार कन्क्लुझिव्ह प्रॉपर्टी कार्ड

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**मुंबई : राज्यात मालमत्ता व्यवहार अधिक पारदर्शक आणि सुरक्षित करण्यासाठी सरकारकडून “लँड टायटलिंग अ‍ॅक्ट” लागू करण्याची तयारी सुरू असल्याची माहिती मंत्री जयकुमार गोरे यांनी दिली. जुलै महिन्यात या कायद्याला अंतिम स्वरूप दिले जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.**



जयकुमार गोरे म्हणाले की, सध्या वापरले जाणारे सातबारा उतारे, प्रॉपर्टी कार्ड किंवा नोंदणी दाखले हे अंतिम मालकी हक्काचे पुरावे मानले जात नाहीत. मात्र नव्या कायद्यांतर्गत नागरिकांना “कन्क्लुझिव्ह प्रॉपर्टी कार्ड” दिले जाईल. हे कार्ड देश-विदेशात वैध मानले जाईल आणि मालमत्तेच्या मालकीबाबत स्पष्टता निर्माण होईल, असे त्यांनी सांगितले.या कायद्यामुळे राज्यात गुंतवणुकीला चालना मिळेल, जमीन व्यवहारांतील वाद कमी होतील आणि मालमत्तेचे बाजारमूल्य अधिक पारदर्शक पद्धतीने निश्चित होण्यास मदत होईल, असा दावा त्यांनी केला.

दरम्यान, नाना पटोले यांनी काही मंत्र्यांवर केलेल्या आरोपांवर प्रतिक्रिया देताना “ज्यांची नावे आहेत ती जाहीर करावीत,” असे आव्हानही जयकुमार गोरे यांनी दिले पुण्यातील अल्पवयीन आरोपीच्या चर्चित प्रकरणाबाबत बोलताना सरकार न्यायालयात कठोर भूमिका मांडणार असून आरोपीला कडक शिक्षा व्हावी यासाठी प्रयत्न केले जातील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

तसेच राज्यातील सेतू प्रणालीतील तांत्रिक अडचणींबाबत बोलताना चंद्रशेखर बावनकुळे यांनी एक-दोन दिवसांत समस्या दूर होतील, असे सांगितले.

विद्यार्थ्यांना अडचण निर्माण झाल्यास अर्ज प्रक्रियेसाठी मुदतवाढ देण्याचाही विचार केला जाईल, असे त्यांनी नमूद केले.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

सोमवार दिनांक 11/05/2026

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी चंद्रकांतदादा पाटलांचे पाऊल

## स्वतःचे 'SIR मॅपिंग' पूर्ण करत नागरिकांना केले आवाहन

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पुणे: राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत (दादा) पाटील यांनी आज स्वतःचे SIR (Special Intensive Revision) मॅपिंग आज कोथरूड मध्ये पूर्ण केले. मतदार यादी अद्ययावत करण्याच्या या प्रक्रियेत स्वतः सहभाग नोंदवून, त्यांनी पुणेकर आणि राज्यातील नागरिकांसमोर एक आदर्श ठेवला आहे.**



मतदार यादीतील पारदर्शकता आणि अचूकता वाढवण्यासाठी भारत निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार SIR मॅपिंग मोहीम राबवली जात आहे. राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत आपल्या मतदार ओळखपत्रातील माहितीची पडताळणी करून, हे मॅपिंग यशस्वीपणे पूर्ण केले. यामुळे त्यांची मतदार यादीतील माहिती आता पूर्णपणे सुरक्षित आणि अद्ययावत झाली आहे.

"लोकशाहीत मतदानाचा अधिकार बजावण्यासाठी मतदार यादीत आपले नाव अचूक असणे आवश्यक आहे. मी माझे SIR मॅपिंग पूर्ण केले आहे, आता आपली बारी आहे.

दुबार नावे टाळण्यासाठी आणि मतदार यादीतील गोंधळ कायमचा दूर करण्यासाठी सर्व नागरिकांनी तातडीने आपले मॅपिंग पूर्ण करावे." असे आवाहन ना. पाटील यांनी सर्व मतदार बांधवांना केले.

# 'शानदार सशक्त नारी पुरस्कार' सोहळ्यात कर्तृत्ववान महिलांचा होणार सन्मान

## झाशीची राणी संघटनेच्या रूपालीताई ठोंबरे पाटील यांच्या हस्ते होणार पुरस्कार वितरण

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**चिंचवड : समाजात विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करत आदर्श निर्माण करणाऱ्या कर्तृत्ववान महिलांचा गौरव करण्यासाठी शबनम न्यूज मीडिया ग्रुप प्रस्तुत 'शानदार सशक्त नारी पुरस्कार 2026' सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय योगदान देणाऱ्या सक्षम महिलांना सन्मानित करण्यात येणार आहे.**




या पुरस्कार सोहळ्याचे प्रमुख आकर्षण म्हणजे ॲड. रुपालीताई ठोंबरे पाटील यांच्या शुभहस्ते पुरस्कार वितरण होणार आहे. त्या पुणे शहर राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्याध्यक्ष तसेच झाशीची राणी संघटनेच्या संस्थापक अध्यक्षा आहेत. हा भव्य पुरस्कार सोहळा शनिवार, दि. 16 मे 2026 रोजी दुपारी 3.30 वाजता तारांगण सभागृह, सायन्स पार्क येथे संपन्न होणार आहे, अशी माहिती शबनम न्यूज मीडिया ग्रुप च्या संचालिका शबनम सय्यद यांनी दिली.

कार्यक्रमाला विविध क्षेत्रातील मान्यवर महिलांची प्रमुख उपस्थिती लाभणार असून त्यामध्ये नगरसेविका सुलभा ताई उबाळे, नगरसेविका प्रियंका ताई बारसे, सौ. प्रियाताई अण्णा बनसोडे, सौ. किरण ताई हर्षवर्धन भोईर, सौ. सोनाली ताई तुषार हिंगे यांचा समावेश आहे.

या सोहळ्यात केवळ वैयक्तिक पातळीवर कार्य करणाऱ्या महिलांचाच नव्हे, तर समाजात परिवर्तन घडविणाऱ्या सक्षम महिला बचत गटांचाही विशेष सन्मान करण्यात येणार आहे. विविध सामाजिक, राजकीय, पत्रकारिता आणि कला क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या महिलांना 'शानदार सशक्त नारी पुरस्कार' देऊन गौरविण्यात येणार आहे.

पुरस्कारासाठी निवड झालेल्या मान्यवरांमध्ये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नगरसेविका दीप्ती अंबरनाथ कांबळे, सामाजिक कार्यकर्ता ऐश्वर्या अमित बाबर , सामाजिक कार्यकर्त्या रेणुका विजय हेगडे, सामाजिक कार्यकर्त्या मेघाली विटकर कुंभार, नगरसेविका अर्चना विनोद तापकीर , नगरसेविका अरुणा गणेश लंगोटे ,सामाजिक कार्यकर्त्या मालिका नितीन साकळे, सामाजिक कार्यकर्त्या शितल संतोष शिंदे, सामाजिक कार्यकर्त्या रुपाली सचिन वाल्हेकर, सामाजिक कार्यकर्त्या अनुराधा आनंद दौंड व पत्रकार तसेच कलाक्षेत्रातून अमृता बाजीराव ओंबाळे यांचा समावेश आहे.

महिलांच्या कार्याचा गौरव करून समाजात सकारात्मक प्रेरणा निर्माण करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेला हा पुरस्कार सोहळा सामाजिक क्षेत्रासाठी प्रेरणादायी ठरणार असल्याची भावना आयोजकांकडून व्यक्त करण्यात आली आहे.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

सोमवार दिनांक 11/05/2026

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# गांजा मिश्रीत 'बंटा गोळी' विक्रीचा मोठा पर्दाफाश

## पिंपरी-चिंचवड गुन्हे शाखेची धडक कारवाई; २.४१ लाखांचा मुद्देमाल जप्त, मध्यप्रदेशातील आरोपी अटकेत

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी चिंचवड प्रतिनिधी | युनूस खतीब**

**पिंपरी-चिंचवड शहरात अंमली पदार्थांच्या अवैध व्यापाराविरोधात गुन्हे शाखेच्या अंमली पदार्थ विरोधी पथकाने मोठी कारवाई करत गांजा मिश्रीत "बंटा गोळी" विक्री करणाऱ्या आरोपीला अटक केली आहे. या कारवाईत तब्बल 149 किलो 715 ग्रॅम वजनाच्या गुंगीकारक बंटा गोळ्या, प्रतिबंधित गुटखा आणि मोबाईल असा एकूण 2 लाख 41 हजार 770 रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**




पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत वाढत्या अंमली पदार्थांच्या अवैध विक्रीवर आळा घालण्यासाठी पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी कठोर कारवाईचे आदेश दिले आहेत. त्यानुसार पोलीस उपआयुक्त गुन्हे शिवाजी पवार व सहाय्यक पोलीस आयुक्त प्रवीण मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ विरोधी पथक सक्रिय झाले आहे.वरिष्ठ पोलीस निरीक्षक महेश पाटील यांच्या नेतृत्वाखाली पथक पेट्रोलिंग करत असताना पोलीस उपनिरीक्षक जिलाणी मोमीन यांना गुप्त माहिती मिळाली की, नानेकरवाडी (ता. खेड, जि. पुणे) परिसरातील एका भाड्याच्या खोलीत गांजा मिश्रीत "बंटा" नावाच्या गुंगीकारक गोळ्यांची बेकायदेशीर विक्री सुरू आहे.

मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी तात्काळ छापा टाकत आरोपी राहुलसिंग हेमराजसिंग लोदी (वय 25) याला ताब्यात घेतले. आरोपी हा मूळचा मध्यप्रदेश येथील असून सध्या नानेकरवाडी येथे वास्तव्यास होता.छाप्यामध्ये आरोपीकडून —149 किलो 715 ग्रॅम गांजा मिश्रीत "बंटा गोळी" महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला गुटखा एक मोबाईल फोन असा एकूण 2,41,770 रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.या प्रकरणी दक्षिण चाकण पोलीस स्टेशन येथे एनडीपीएस ॲक्ट 1985 अंतर्गत कलम 8(क), 20(ब)(ii)(क), 29 तसेच भारतीय न्याय संहिता 2023 आणि अन्न सुरक्षा मानके अधिनियम 2006 अंतर्गत विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून पुढील तपास दक्षिण चाकण पोलीस करीत आहेत.

ही कारवाई पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे, सहपोलीस आयुक्त शशिकांत महावरकर, अपर पोलीस आयुक्त सारंग आवाड, पोलीस उपआयुक्त शिवाजी पवार आणि सहाय्यक पोलीस आयुक्त प्रवीण मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.कारवाईमध्ये वरिष्ठ पोलीस निरीक्षक महेश पाटील, पोलीस उपनिरीक्षक जिलाणी मोमीन, निखिल शेटे, कपिलेश इगवे, निखिल वर्षे, सदानंद रुद्राक्षे, सपकाळ आदींच्या पथकाने सहभाग घेतला. तसेच पोलीस अंमलदार सुभाष गुरव यांनी तांत्रिक विश्लेषणासाठी मदत केली.पोलीस प्रशासनाने नागरिकांना आवाहन केले आहे की, अंमली पदार्थांबाबत कोणतीही माहिती मिळाल्यास अंमली पदार्थ विरोधी पथकाच्या 8600002320 या क्रमांकावर, पोलीस हेल्पलाईन 112 किंवा मानस हेल्पलाईन 1933 वर संपर्क साधावा.

# मुळशीत मोटारसायकल चोरट्यांचा पर्दाफाश

## पौड पोलिसांची धडाकेबाज कारवाई, चार दुचाकी जप्त

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पौड : मुळशी तालुक्यात वाढत्या मोटारसायकल चोरीच्या घटनांना आळा घालण्यात पौड पोलिसांना मोठे यश आले असून, दोन सराईत मोटारसायकल चोरांना अटक करण्यात आली आहे. त्यांच्या ताब्यातून तब्बल चार चोरीच्या मोटारसायकली जप्त करण्यात आल्या असून, या कारवाईमुळे परिसरातील वाहनचोरांच्या टोळीचा पर्दाफाश झाला आहे. जप्त करण्यात आलेल्या वाहनांची किंमत सुमारे 2 लाख 40 हजार रुपये इतकी असल्याची माहिती पोलिसांनी दिली.**



पुणे ग्रामीण जिल्ह्यातील पौड तसेच हिंजवडी परिसरात मागील काही दिवसांपासून दुचाकी चोरीच्या घटनांमध्ये वाढ झाली होती. या पार्श्वभूमीवर पौड पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संतोष गिरी गोसावी यांनी वाहन चोरीच्या गुन्ह्यांचा तपास वेगाने करण्याच्या सूचना दिल्या होत्या.

दरम्यान, पौड पोलिसांचे पथक मोटारसायकल चोरीच्या गुन्ह्यांचा तपास करत असताना घोटावडे येथील हनुमान चौक परिसरात दोन संशयित इसम विनानंबर स्प्लेंडर मोटारसायकलवर फिरताना आढळून आले.

पोलिसांनी त्यांना थांबवून चौकशी केली असता त्यांनी आपली नावे साहिल नवनाथ गोडांबे (वय 20, रा. गोडांबेवाडी, घोटावडे, ता. मुळशी) आणि शुभम सुरेश मातेरे (वय 23, रा. मातेरेवाडी, घोटावडे, ता. मुळशी) अशी सांगितली.मात्र, त्यांच्या ताब्यातील मोटारसायकलबाबत विचारणा केली असता त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिल्याने पोलिसांचा संशय बळावला. त्यानंतर दोघांना ताब्यात घेऊन पौड पोलीस स्टेशन येथे सखोल चौकशी करण्यात आली.

चौकशीत त्यांनी एका विधी संघर्ष बालकाच्या मदतीने पौड आणि हिंजवडी पोलीस ठाण्याच्या हद्दीतून चार मोटारसायकली चोरी केल्याची कबुली दिली.

**या कारवाईत खालील गुन्हे उघडकीस आले आहेत:**

पौड पोलीस स्टेशन गु.र.नं. 133/2026 भा.न्या.सं. 303(2)

हिंजवडी पोलीस स्टेशन गु.र.नं. 258/2026 भा.न्या.सं. 303(2)

तसेच जप्त करण्यात आलेल्या अन्य दोन वाहनांचे इंजिन व चेसिस नंबर तपासून संबंधित गुन्ह्यांची माहिती घेतली जात असल्याचे पोलिसांनी सांगितले.

ही कारवाई पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल्ल, अप्पर पोलीस अधीक्षक रमेश चोपडे, उपविभागीय पोलीस अधिकारी सुनील कुमार पुजारी यांच्या मार्गदर्शनाखाली पौड पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संतोष गिरी गोसावी यांच्या नेतृत्वात करण्यात आली.

कारवाईत सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण, पोलीस हवालदार दिलीप सुपे, सिद्धेश पाटील, गौतम लोकरे, प्रशांत बुणगे, तसेच पोलीस शिपाई सुशांत गायकवाड, बाबासो पाटील आणि संदीप दराडे यांनी सहभाग घेतला.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

सोमवार दिनांक 11/05/2026

e Paper

पिंपरी चिंचवड | पुणे

# क्रीडा नगरी म्हणून पिंपरी चिंचवडचा देशभर नावलौकिक व्हावा - खा. श्रीरंग बारणे

## महापौर चषक राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेत शिवछत्रपती पुरस्कार विजेत्या खेळाडूंचा सत्कार

>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी : पिंपरी चिंचवड ही नगरी कबड्डी खेळाची पंढरी आहे. येथून अधिकाधिक राष्ट्रीय खेळाडू घडावेत आणि क्रीडा नगरी म्हणून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे नाव देशभरात नावलौकिक मिळावा, असे प्रतिपादन खासदार श्रीरंग आप्पा बारणे यांनी केले. प्रो कबड्डीच्या माध्यमातून खेळाडूंना मोठ्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. भविष्यात अधिकाधिक खेळाडूंनी या क्षेत्रात यश संपादन करावे, असे देखील त्यांनी खेळाडूंना शुभेच्छा देताना सांगितले.**




महापौर रवि लांडगे यांच्या संकल्पनेतून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने महापौर चषक राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा 2026 चे भोसरी येथील गावजत्रा मैदानावर आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेला खासदार श्रीरंग आप्पा बारणे यांनी भेट दिली. यावेळी ते बोलत होते.

यांप्रसंगी महापौर रवि लांडगे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, नगरसदस्य तथा शिवसेना गटनेते विश्वजीत बारणे, नगरसदस्य निलेश तरस, नगरसदस्या सुलभा उबाळे, उपायुक्त पंकज पाटील, क्रीडा अधिकारी रंगराव कारंडे, क्रीडा पर्यवेक्षक दीपक कन्हेरे, क्रीडा पर्यवेक्षक अरूण कडूस यांच्यासह क्रीडाप्रेमी व नागरिक उपस्थित होते.

याप्रसंगी खासदार श्रीरंग आप्पा बारणे यांच्या हस्ते विविध क्रीडा प्रकारातील शिवछत्रपती पुरस्कार विजेत्या खेळाडूंचा सत्कार करण्यात आला. यामध्ये बॉक्सिंगमधील 1997-98 चे शिवछत्रपती पुरस्कार विजेते विजय यादव, कबड्डीमधील 2015-16 च्या शिवछत्रपती पुरस्कार विजेत्या पूजा शेलार, कबड्डीतील शिवछत्रपती पुरस्कार विजेते राजू घुले, सायकलिंगमधील 2003-04 च्या शिवछत्रपती पुरस्कार विजेत्या मीनाक्षी शिंदे, जलतरणमधील 2020-21 च्या शिवछत्रपती पुरस्कार विजेत्या वैष्णवी जगताप तसेच कबड्डीमधील 2023-24 चे शिवछत्रपती पुरस्कार विजेते विराज

# मोशीत सुरक्षा रक्षकाकडून चिमुकल्यांवर अत्याचाराचा प्रयत्न

## चार मुलींशी अश्लील वर्तन, आरोपी गजाआड

>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी-चिंचवड : पिंपरी-चिंचवड शहर पुन्हा एकदा संतापजनक घटनेने हादरले असून, मोशी परिसरातील एका नामांकित सोसायटीत सुरक्षा रक्षकानेच चार निष्पाप चिमुकल्यांशी अश्लील वर्तन करत अत्याचाराचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. विशेष म्हणजे, आरोपीचा सोसायटीतील हा पहिलाच दिवस होता आणि पहिल्याच दिवशी त्याने आपल्या विकृत मानसिकतेचे भयावह रूप दाखवल्याने परिसरात तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.**



मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी दिनेश चौधरी हा संबंधित सोसायटीत सुरक्षा रक्षक म्हणून कामावर रुजू झाला होता. रहिवाशांच्या सुरक्षेची जबाबदारी सांभाळणाऱ्या या व्यक्तीनेच पाच ते दहा वर्षे वयोगटातील चार चिमुकल्या मुलींना लक्ष्य केले. मुलींना एकटे पाहून त्यांच्याशी अश्लील वर्तन करत गैरप्रकार करण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचा आरोप आहे.

या घटनेतील एका दहा वर्षीय मुलीने मोठे धाडस दाखवत आईला घडलेला प्रकार सांगितला. मुलीच्या सांगण्यावरून पालक हादरले आणि तत्काळ पोलिसांकडे धाव घेतली. यानंतर भोसरी एमआयडीसी पोलिसांनी तातडीने कारवाई करत आरोपी दिनेश चौधरी याला अटक केली.या प्रकारामुळे मोशी परिसरात भीती आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. "ज्याच्यावर मुलांच्या सुरक्षेची जबाबदारी दिली, तोच भक्षक निघाला," अशी संतप्त प्रतिक्रिया रहिवाशांकडून व्यक्त केली जात आहे.दरम्यान, वाढत्या अशा घटनांमुळे पालकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले असून, मुलांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

नसरापूरमधील अल्पवयीन मुलीवरील अत्याचाराच्या घटनेनंतर आता मोशीतील हा प्रकार समोर आल्याने नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

तज्ज्ञांच्या मते, पालकांनी मुलांशी नियमित संवाद ठेवणे, 'गुड टच-बॅड टच'ची माहिती देणे, तसेच मुलांच्या वागण्यात होणारे बदल गांभीर्याने घेणे अत्यंत आवश्यक झाले आहे. कारण आता धोका केवळ निर्जन रस्त्यांवर नाही, तर घराजवळ आणि सोसायटीच्या गेटवरही दबा धरून बसला आहे.

पोलिसांनी आरोपीविरोधात गंभीर कलमान्वये गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरु आहे. नागरिकांकडून आरोपीला कठोरात कठोर शिक्षा देण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 89999 48968

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

सोमवार दिनांक 11/05/2026

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

